PAGE No.
DATE / /

## माझे गाव
## काल, आज आणि उद्याः-

माझे मूळ गाव नाशिक, पण माझ्या लहानपणीच म्हणजे वयाच्या नवव्या वर्षीच वडीलांची बदलीमुळे ते सोडावे लागले. अनेक गावे बदलत शेवटी, मुंबईला १९६० मध्ये आलो आणि गेली ५६ वर्षे राहिलो, म्हणून मी आजही मुंबईलाच माझे गाव मानतो. खरे तर मी अगदी लहानपणापासून, म्हणजे, १९४५-४६ पासून मुंबईला माझ्या मावशी, आत्या आणि मामाकडे सुट्टीत येत असे. त्यावेळची मुंबई इतर शहरांप्रमाणेच एक शांत नगरी होती. मला स्वातंत्र्य चळवळीतील सत्याग्रह, मोर्चे, प्रभात फेरी, संचारबंदी, लाठीमार इ. अंधुकपणे आठवते. त्या काळात मुंबईत मराठी भाषिक हे बहुसंख्य असले तरी गुजराती, पारशी, बोहरी मुस्लीम, पंजाबी आणि दाक्षिणात्य लोक राहत होते. असे असले तरी मुंबईत कोणत्याही भागात मराठी बोललेले सर्वांना समजत होते आणि बोलताही येत होते. ट्राम आणि व्हिक्टोरिया हे मुंबईचे वैशिष्ट्य होते. स्वस्ताई इतकी, की सात पैसे तिकिटात किंग सर्कल ते म्युझियम हा प्रवास करता येत होता. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मला आठवते की इंग्रजांच्या सत्तेत असलेली शिस्त, पोलिसांची रास्त अशी भीती, १९५५ पर्यंत वाटत होती. त्याकाळात एक दिशा मार्ग, नो पार्किंग, नो एन्ट्री अशा पाट्या दिसत नव्हत्या. सरकारी काम होण्या-साठी चहापाणी द्यावे लागत नव्हते, शिपायाच्या हातात चार आणे ठेवले तरी काम होत होते, कारण बहुसंख्य सरकारी अधिकारी ब्रिटीशांच्या शिस्तीत तयार झालेले होते. मी मुंबईत १९६० मध्ये कायमचा राहण्यास आलो तेव्हाही परिस्थिती फारशी बदलेली नव्हती. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्य स्थापन होऊन, मा. यशवंतराव चव्हाण हे चांगले मुख्यमंत्री उत्तमरीत्या राज्य चालवत होते. हवेचे प्रदूषण, ध्वनी प्रदूषण मर्यादित होते. गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सवात हिराबाई बडोदेकर,

मास्टर कृष्णराव, ज्योत्स्ना भोळे आदी मोठे गायक विनामूल्य आपली गानसेवा सादर करित असत. फटाके आजच्यासारखे कोणत्याही प्रसंगात वाजत नसत, फक्त दिवाळीतच वाजत असत.

त्यानंतर अनेक वर्षे गेली. मी माझे शिक्षण पूर्ण करून नोकरी केली, लग्न झाले, संसार केला, माझी मुले शिकली, त्यांचे लग्न झाले, माझ्या नातवंडांचा जन्म झाला. इतकी वर्षे गेली आणि आज मुंबईची लोकसंख्या आतोनात वाढली आहे. वाहने प्रचंड संख्येने वाढली, रस्ते त्या प्रमाणात वाढले नाहीत, हवा कमालीची प्रदूषित झाली आहे. मुंबईतील टेकड्या आणि डोंगर, अनाधिकृत झोपड्यांनी व्यापून गेले. पोलिसांची भीती कमी झाल्यामुळे गुन्हेगारी वाढली, बकालपणा वाढला. १९५५ मध्ये महाराष्ट्रीय लोक ५८% वरून २०% वर आले. माझ्या लहानपणी लोकल गाड्यांमध्ये सर्वांना बसायला जागा मिळत होती, तर आता उभे रहायलासुध्दा जागा मिळत नाही. सार्वजनिक सणांचे बाजारीकरण झाले आहे, लोकांना कुटुंबियांशी बोलायलाही वेळ नाही आणि घड्याळाच्या काट्यामागे धावत असतात. हातात भरपूर पैसे खुळखुळू लागले आणि लोकांना दुसऱ्यांची गरज वाटेनाशी झाली.

मला आता प्रश्न पडतो की उद्याची मुंबई कशी असेल? २०१४ पर्यंत वाटत होते की, वाढती लोकसंख्या, बेशिस्त, गुन्हेगारी, भाववाढ हे बघता एक दिवस मुंबईमध्ये राहणारे बहुसंख्य लोक मुंबईला कायमचा राम राम ठोकतील आणि काळाबाजारवाले, गुंड यांच्या ताब्यात हे शहर जाईल. पण पंतप्रधान मोदी यांनी नोटा रद्द करण्याचा निर्णय घेतला तसेच अनेक क्रांतिकारक निर्णय घेतले, जगात भारताची प्रतिष्ठा वाढवली आणि कुठेतरी आशेचा

किरण दिसू लागला. लवकरच काळाबाजार करणारे भ्रष्ट राजकारणी आणि गुंड यांना आपले धंदे बंद करून प्रामाणिकपणे जगण्याची बुध्दी होईल. तसेच भारतातील इतर राज्यातील भ्रष्ट राज्यकर्ते गेले, तर त्या राज्यात उद्योगधंदे वाढून मुंबईत येणारे परप्रांतीयांचे लोंढे कमी होतील आणि मुंबईतील गर्दी कमी होईल. रस्ते खड्डेमुक्त होतील, विजेवर चालणारी वाहने रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात धावताना दिसतील आणि हवेचे, तसेच ध्वनी प्रदूषण मर्यादित होईल. माझी ईश्वरचरणी प्रार्थना आहे की असेच होवो आणि माझ्यासारख्या अनेकांना मुंबईला पुन्हा जावेसे वाटेल.



डॉ. अरुण जोशी
संपर्क : ९८६९२६७५२०

